महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com


म्हाडा MHADA

================================================================

जावक क्रमांक – ८२६ /१०२ दिनांक :- १३ ऑगस्ट, २०२५

प्रसिद्धिपत्रक

म्हाडा कोकण मंडळ सोडत - २०२५

# ५,२८५ सदनिका आणि ७७ भूखंड विक्रीसाठी आयोजित सोडतीकरिता ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी २८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

१८ सप्टेंबर २०२५ रोजी ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे संगणकीय सोडत

मुंबई, दि. १३ ऑगस्ट, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर व जिल्हा, वसई (जि. पालघर) येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत ५ हजार २८५ सदनिका व ओरोस (जि. सिंधुदुर्ग), कुळगाव-बदलापूर येथील ७७ भूखंड विक्रीकरिता आयोजित सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनामत रकमेसह प्राप्त अर्जाची सोडत आता दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी ठाणे येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे काढण्यात येणार आहे, अशी माहिती मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी दिली.

नवीन वेळापत्रकानुसार सदर सोडतीसाठी दि. २८ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करता येणार आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदार या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची प्रारूप यादी ०७ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ०६ .०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता 'म्हाडा'च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

कोकण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली ही सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण ५६५ सदनिका, १५ टक्के एकात्मिक शहर गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३००२ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजना व विखुरलेल्या सदनिका आहे त्या स्थितीमध्ये या योजनेअंतर्गत १६७७ सदनिका, म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत (५० टक्के परवडणाऱ्या सदनिका) ४१ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच म्हाडा कोकण मंडळ गृहनिर्माण योजनेअंतर्गत ७७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सोडतीसंदर्भात अर्ज भरतांना अर्जदारांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी मंडळातर्फे ०२२ - ६९४६८१०० हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

===================================================

Outward No. : 826 / 102 Dt. 13th August, 2025

**Press Release**

**MHADA Konkan Board grants extension for submitting online applications for the lottery of 5,285 flats and 77 plots until August 28**

Computerized lottery to be held on September 18, 2025, at Dr. Kashinath Ghanekar Natyagriha, Thane

Mumbai, August 13, 2025: The Konkan Housing and Area Development Board, a regional unit of the MHADA has granted extension for registration and submission of online applications for the sale of 5,285 flats in various housing schemes in Thane city and district, Vasai (District Palghar), and 77 plots in Oros (District Sindhudurg) and Kulgaon-Badlapur until August 28, 2025.

The computerized draw of the applications received along with earnest money will now be held on September 18, 2025, at Dr. Kashinath Ghanekar Natyagriha, Thane, informed the Board's Chief Officer, Mrs. Revati Gaikar.

As per the revised schedule, applicants can submit online applications for the lottery until 11:59 PM on August 28, 2025. Payment of the earnest money can be made online until 11:59 PM on August 29, 2025. Only applicants who submit all required documents will be considered eligible under this system. The provisional list of accepted applications for the lottery will be published on September 7, 2025, at 6:00 PM on MHADA's official website https://housing.mhada.gov.in.

Applicants may submit claims and objections regarding the provisional list until 6:00 PM on September 9, 2025. The final list of accepted applications for the lottery will be published on September 16, 2025, at 6:00 PM on MHADA's website.

The Konkan Board online lottery is divided into five components - 565 flats are included for sale under 20% Comprehensive Scheme. Under . 3002 flats are included under 15% Integrated Urban Housing Scheme. While 1677 flats are included under MHADA Konkan Board Housing Scheme & scattered flats in as-is condition. MHADA Konkan Board Housing Scheme (50% Affordable Housing) –component included 41 flats . There are 77 plots for sale available in the lottery.

To assist applicants facing difficulties during the application process, the Board has provided a helpline number: 022-69468100.

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

-----------------------------------------------------------------------------------------------------------